**मे. कल्पवृक्ष डेव्हलपर्स प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून सि. एस. नं. ५/६००, मलबार, हिल-कंबाला हिल डिव्हिजन, ऑगष्ट क्रांती मार्ग, ड वार्ड, मुंबई** येथे रहिवासी इमारत पुनर्बांधणी प्रस्तावाच्या जनसुनावणीचे इतिवृत्त

| | | |
|---|---|---|
| **लोकसुनावणी दिनांक** | : | **०६.१०.२०१२** |
| **वेळ** | : | **दुपारी १२.०० वाजता** |
| **स्थळ** | : | **जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** |

**मे. कल्पवृक्ष डेव्हलपर्स प्रकल्प प्रवर्तक यांचेकडून सि. एस. नं. ५/६००, मलबार, हिल-कंबाला हिल डिव्हिजन, ऑगष्ट क्रांती मार्ग, ड वार्ड, मुंबई** येथे रहिवासी इमारत पुनर्बांधणीचा प्रस्ताव आहे. सदर प्रकल्पाची जनसुनावणी सागरी तटीय विनियमन अधिनियम २०११ चे कलम क्र. ८ (व्ही) डी सी ४ नुसार घेणे कायद्याने बंधनकारक आहे. ही जाहीर जनसुनावणी फक्त प्रकल्पातील कायदेशीर भाडेकरु/ रहिवाशांकरिता आयोजित करण्याची तरतूद आहे.

त्यानुसार प्रकल्प व्यवस्थापनाने महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाकडे अर्ज केला असून, मप्रनि मंडळाने जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांच्या परवानगीने जनसुनावणीसाठी शनिवार दिनांक ०६/१०/२०१२ ही तारीख निश्चित करण्यात आली. पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतूदीप्रमाणे, सदर जनसुनावणीची जाहीर सूचना, मप्रनि मंडळाने दिनांक ०६.०९.२०१२ रोजीच्या मराठी दैनिक 'नवशक्ती' व इंग्रजी दैनिक 'फ्री प्रेस जर्नल' मध्ये नोटीस प्रसिध्द केली व त्यानुसार सर्व संबंधित व्यक्तींना आवाहन करुन, त्यांच्या सुचना, टिकाटिप्पणी, विचार, आक्षेप इत्यादी, संबंधित नियामक प्राधिकरण येथे नोंदविण्याबाबत नमुद करण्यात आले होते.

कार्यकारी सारांशाची इंग्रजी व मराठी प्रत, जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर); पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई; प्रादेशिक अधिकारी, मुख्यालय, मप्रनि मंडळ, सायन, मुंबई; प्रादेशिक व उप प्रादेशिक कार्यालय, श्री छत्रपती शिवाजी महाराज महानगर पालिका मंडई, माता रमाबाई आंबेडकर मार्ग, मुंबई-४०० ००१ व **सहायक आयुक्त, ड वार्ड, ऑफिस बिल्डिंग, रुम नं. ११०, १ ला मजला, जोबानपुत्र कंपाऊंड, नाना चौक, मुंबई -०७** येथे संबंधितांचे अभ्यासासाठी ठेवण्यात आली होती. उपरोक्त जाहीर जनसुनावणीबाबत अधिसूचनेमध्ये नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करुन प्रसिध्दी देण्यात आली. जेणेकरुन, प्रकल्प बाधित अथवा संबंधित व्यक्तींना त्यांचे आक्षेप, टिकाटिप्पणी, विचार अथवा सूचना संबंधित नियामक प्राधिकरणास नोंदविणे सोईचे होईल.

सुनावणीचे स्थळ **जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई (शहर), ओल्ड कस्टम हाऊस, शहिद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई - ४०० ००१** येथे ठेवण्यात आले. कारण, हे स्थळ प्रकल्पाजवळचे असून, भाडेकरुंना येण्यासाठी सोईस्कर असल्याने याठिकाणी जनसुनावणी ठेवण्यात आली.

सदर जनसुनावणी घेण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केंद्रीय पर्यावरण व वन विभागाचे पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मधील तरतुदीप्रमाणे लोकसुनावणीसाठी खालील प्रमाणे समिती गठीत केली होती.

**१) श्री चंद्रशेखर व. ओक** — **- अध्यक्ष**
**जिल्हाधिकारी मुंबई शहर.**

**२) डॉ. जि.बा.संगेवार** — **- सदस्य**
**प्रादेशिक अधिकारी, मुंबई**

**३) श्री. आ.शे.नांदवटे** — **- आयोजक**
**प्रभारी उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई १**

जनसुनावणीच्या सुरवातीस, मा. अध्यक्ष, जनसुनावणी समिती यांनी पुनर्बांधकाम प्रकल्पाचे रहिवाशांची संख्या व सुनावणीसाठी उपस्थित रहिवाशांची संख्या याबाबत विचारणा केली. सुनावणीचे आयोजक यांनी सदर प्रकल्पाचे जनसुनावणीबाबत पर्यावरण आघात मुल्यांकन अधिनियम २००६ मध्ये नमुद केलेल्या तरतुदी नुसार प्रसिध्दी देण्यात आली असल्याचे नमुद केले. प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगीतले की, सदर प्रकल्पाचे ५ रहिवाशी असून त्यापैकी श्री. तुषार रहिवार्शीचे प्रतिनीधी जनसुनावणीस उपस्थित आहेत. उर्वरीत रहिवार्शींनी त्यांना जनसुनावणीस उपस्थित राहण्याबाबत प्राधिकृत केले आहे. सबब, त्याबाबतचे प्राधिकार पत्र म.प्र.नि. मंडळाकडे सुपूर्द करण्यात येईल. तद्नंतर, श्री. आ.शे.नांदवटे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी अध्यक्ष व उपस्थित अभ्यागतांचे स्वागत करून,जनसुनावणीच्या पध्दतीबददल माहिती दिली. त्यांनी उपस्थितांना पर्यावरण विषयक सूचना, विचार, आक्षेप इत्यादी घेऊन पुढे यावे अशी विनंती केली. तसेच त्यांनी ही सुनावणी इमारतीच्या रहिवाशी / भाडेकरुंकरीता आयोजित केलेली आहे. जेणेकरुन, त्यांचे पर्यावरण विषयक प्रश्न/शंकाचे निरसन करण्यात येईल. तद्नंतर त्यांनी जनसुनावणी समितीचे अध्यक्ष यांना जनसुनावणीची कार्यवाही सुरु करण्याबाबतची विनंती केली.

जनसुनावणी समितीचे अध्यक्ष, मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांनी उपस्थित जनसमुदायास **मे. कल्पवृक्ष डेव्हलपर्स** यांच्या बांधकाम प्रकल्प प्रस्तावाबाबत आपल्या सूचना, विचार, आक्षेप घेऊन पुढे यावे अथवा त्या लेखी स्वरूपात मांडाव्यात असे आवाहन केले. आपण व्यक्त केलेले मत, सूचना, आक्षेप व आपल्या भावना, कायद्यात नमुद केलेल्या तरतुदीप्रमाणे पर्यावरण

प्रभाव निर्धारण प्राधिकरण, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई, तसेच पर्यावरण विभाग, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई यांना कळविण्यात येतील. सदर सुनावणीचे छायाचित्रीकरण म.प्र.नि मंडळाकडून कायद्यातील नमुद तरतुदी प्रमाणे करण्यात येत आहे. तरी प्रत्येकाने आपले प्रश्न शांतपणे व सनदशिर मार्गाने उपस्थित करावेत व जनसुनावणी शांतपणे पार पाडण्यात सहकार्य करावे असे आवाहन केले. प्रत्येकाने आपले प्रश्न विचारण्यापूर्वी आपले नाव व पत्ता सांगावा जेणे करून सुनावणीचा इतिवृत्तांत बनविते वेळी, सदर बाबी नमुद करण्यात येतील. त्यानंतर त्यांनी प्रकल्प प्रवर्तक **मे. कल्पवृक्ष डेव्हलपर्स** यांना प्रस्तावित प्रकल्पाबाबतची माहिती उपस्थितांना देण्यात यावी. तसेच त्यांचे प्रश्न व प्रकल्पाबाबत शंकानिरसन करावे अशी विनंती केली.

प्रकल्पाचे पर्यावरण विषयक तांत्रिक सल्लागार **श्री. एस. ताम्हाणे** यांनी सांगितले की, सदर पुर्नबांधकाम प्रकल्पास सागरी तटीय विनीयमन अधिनियम १९९१ अंतर्गत ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाले असून सुधारीत अधिनियम २०११ नुसार परवाना व अतिरीक्त चटईक्षेत्रासाठी अर्ज केला आहे. त्यानंतर त्यांनी नियोजित प्रकल्पांबाबत पर्यावरण विषयक केलेला अहवाल खालील प्रमाणे मराठी भाषेत सादर केला.

- प्रकल्पांचे विश्लेषण
- हवा, पाणी, जमिन, ध्वनी, विस्थापन इत्यादी बाबतची माहिती.
- नियोजित प्रकल्पांमुळे हवा, पाणी, विस्थापन, जैवविविधता व वन यावर होणारे परिणाम व्यवस्थापन.
- बांधकाम व प्रकल्प चालू झाल्यानंतर केले जाणारे पर्यावरण व्यवस्थापन याबाबतची माहिती.
- इतर पर्यावरण व्यवस्थापनविषयीची माहिती.

प्रकल्पधारकाने पर्यावरण विषयीची सविस्तर माहिती दिल्यानंतर, सुनावणीचे आयोजक यांनी असे आवाहन केले की, यानंतर प्रश्न उत्तरे घेतले जातील. आपणांस विनंती की, सदर प्रकल्पाच्या पर्यावरण विषयक प्रश्न विचारावेत व त्याचे समर्पक उत्तर प्रकल्प धारकाने द्यावे.

**१. जिल्हाधिकारी, मुंबई शहर**

| अनु.क्र | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | सद्य:स्थितीत प्रकल्पाच्या ठिकाणी किती वृक्ष आहेत व भविष्यात नवीन वृक्ष लावण्याचे नियोजन आहे काय? | सद्य:स्थितीत ५ वृक्ष आहेत आणि भविष्यात विविध प्रकारचे वृक्ष लावण्यात येतील. |
| २ | तुम्ही विविध प्रकारचे वृक्ष लावण्याचे सादरीकरणात नमुद केले आहे. परंतु मुंबई व सभोवतालच्या परिसरात लिंबं, कडुलिंब इ. वृक्षांची लागवड करणे शक्य आहे काय? | जे वृक्ष मुंबई व सभोवतालच्या परिसरात वाढू शकतात अशाच वृक्षांची लागवड करण्यात येईल. |

## २. उप प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१

| अनु.क्र | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | प्रदुषणाचा अधिभार कमी करण्यासाठी सांडपाणी प्रक्रिया यंत्रणेत ग्रे वॉटर ट्रिटमेंट ऐवजी इलेक्ट्रॉलिसीस तंत्रज्ञानाचा विचार का करत नाही? | इलेक्ट्रॉलिसीस प्रक्रिया यंत्रणेचा दुरूस्ती व देखभालीचा खर्च ग्रे वॉटर ट्रिटमेंट यंत्रणेपेक्षा तुलनेने जास्त आहे. तरी आपण व्यक्त केलेल्या अभिप्रायाबाबत आम्ही विचार करू. |
| २ | सध्य स्थितीत पुनर्बांधकाम प्रकल्पाची काय स्थिती आहे? | मुंबई महानगर पालिकेकडून मंजूर झालेला आराखडा व चटईक्षेत्राप्रमाणे इमारतीचे बांधकाम ८ माळयापर्यंत पुर्ण झालेले आहे. सागरी तटीय विनिमयन अधिनियम २०११ नुसार परवाना व अतिरीक्त चटईक्षेत्रासाठी अर्ज केला आहे. प्राधीकरणाकडून मंजुरी मिळाल्यानंतरच उर्वरीत बांधकाम सुरू करण्यात येईल. |

## ३. प्रादेशिक अधिकारी, मुंबई-१

| अनु.क्र | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | प्रकल्पात सौर ऊर्जा या अपारंपारीक स्त्रोतांचा उपयोग केला जाणार आहे का? | सदर प्रकल्पात सौर ऊर्जा या अपारंपारीक स्त्रोतांचा उपयोग करण्यात येईल. |

## ४. श्री. तुषार, रहिवाशी.

| अनु.क्र | प्रश्न | उत्तरे |
|---|---|---|
| १ | सदर बांधकाम प्रकल्पासंबंधी आमचे काही म्हणणे नाही. पर्यावरण विषयक प्रस्तावित प्रयोजना बददल मी समाधानी आहे. | --- |

तद्नंतर आयोजकांनी उपस्थितांना आव्हान केले की, तुमचे आणखी काही प्रश्न असतील, तर ते उपस्थित करावेत. परंतु नंतर कोणी प्रश्न उपस्थित केले नाहीत.

अध्यक्षांनी जनसुनावणीच्या समारोपाच्या भाषणामध्ये जनसुनावणीचा आढावा घेतला व जनसुनावणी संपल्याचे जाहीर केले.

आ. शे. नांदवटे
प्रभारी उपप्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, मुंबई-१
आयोजक
लोकसुनावणी समिती

डॉ. जि.बा.संगेवार
प्रादेशिक अधिकारी,
म.प्र.नि. मंडळ, मुंबई
तथा
सदस्य
लोकसुनावणी समिती

चंद्रशेखर व. ओक,
जिल्हाधिकारी
मुंबई शहर,
तथा
अध्यक्ष
लोकसुनावणी समिती.

# MINUTES OF PUBLIC HEARING OF REDEVELOPMENT CONSTRUCTION PROJECT OF

# M/s. Kalpavruksha Developers Pvt. Ltd., on plot bearing C. S/ No. 5/600 of Malbar Hill-Coambala, Hill Division at August Kranti Marg, "D-Ward", Mumbai

**Date of Public Hearing: 06/10/2012,** **Time : 12:00 hrs.**

**Venue : Office of Collector & District Magistrate Mumbai (City), Old Custom house, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai – 400 001**

---

Project proponent **M/s. Kalpavruksha Developers Pvt. Ltd** proposes redevelopment construction of plot bearing **C. S. No. 5/600 of Malbar Hill-Coambala, Hill Division at August Kranti Marg, "D-Ward", Mumbai**. As per Coastal Regulation Zone (CRZ) Notification dtd. 6th January 2011 under item 8 (V) (d) (c) 4, Public hearing of tenants / residents is required to be carried out. The said public hearing is to be conducted as per procedure laid down under EIA Notification dated 14th September, 2006 issued by Ministry of Environment & Forest, Govt. of India, New Delhi.

In this connection, the project proponent submitted an application to Maharashtra Pollution Control Board, which decided to hold public hearing in respect of the said project on **06.10.2012** in consultation with the Office of Collector & District Magistrate Mumbai (City), Old Custom house, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai – 400 001. Maharashtra Pollution Control Board published public notices in Marathi newspaper namely "Dainik Navshakti" and English newspaper "The Free Press Journal" dated **06.09.2012** mentioning the date, time & venue of public hearing. The appeal was made to tenants / residents of the said property to submit their written objections, suggestions, complaints, comments, if any, in respect of the above said project, to concerned Regulatory Authority.(Annex-A). It was also mentioned that written responses from the tenants will also be accepted at the time of public hearing.

The venue for the said public hearing was decided at the **Office of Collector & District Magistrate Mumbai (City), Old Custom house, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai – 400 001.** The venue was finalized considering the facilities such as easy accessibility to tenants/residents. Copies of Executive Summary in respect of the said project were made available in Marathi and English in the Offices of

- The Collector & District Magistrate Mumbai City, Old Custom house, Shahid Bhagat Singh Marg, Mumbai – 400 001.
- Regional Officer (P&P), MPCB, Sion, Mumbai,

- Regional Office & Sub Regional Office, Mumbai - I, Maharashtra Pollution Control Board, Shri Chatrapati Shivaji Maharaj Mandai, Municipal Market Building, 4th Floor, Mata Ramabai Ambedkar Road, Mumbai- 400 001
- Environment Dept. New administrative building, 15th floor, Mantralaya, Mumbai.
- **Astt. Commissioner, 'D' Ward Office Bldg. R.No.110, Jobanputra Compound, Nana Chowk, Mumbai – 07**

All these authorities were requested to arrange to give wide publicity to the same within their respective jurisdiction.

A public hearing Committee comprising of the following members was constituted by Maharashtra Pollution Control Board in accordance with the Coastal Regulation Zone (CRZ) Notification dtd. 6th January 2011 & EIA Notification 2006.

1. **Shri. Chandrashekhar V. Oak** -- Chairman
   Collector, Mumbai City.
2. **Dr. J. B. Sangewar** -- Member
   Regional Officer,
   Maharashtra Pollution Control Board,
   Mumbai
3. **Shri. A.S. Nandvate** -- Convener
   I/c. Sub-Regional Officer
   Maharashtra Pollution Control Board,
   Mumbai - I.

At the outset, Hon'ble Chairman of the panel inquired about no. of tenants of redevelopment project and tenants present for the hearing. Convener of the panel submitted that wide publicity of the public hearing was given as per procedure laid down in EIA notification 2006. Project proponent submitted that there are 5 tenants of the said property out of which Shri. Tushar is present for public hearing. Remaining tenants have authorized Shri. Tushar as their representative for the said hearing. The authority letter will be submitted to MPCB. Thereafter, Shri. A.S. Nandvate, Sub-Regional Officer welcomed all those present and commenced the public hearing. Further, he apprised the tenants/residents with the introductory information about the purpose of public hearing and appealed them to come forward with their suggestions, complaints, objections & comments if any, regarding the environmental aspects of the proposed project. He further requested Chairman, Public hearing panel, to commence the hearing procedure.

The Chairman briefed the tenants about the concept and objective of Public Hearing and made an appeal to the tenants/residents to place their views regarding

Environmental related aspect and observe the presentation made by the project proponent and come forward with their questions, complaints, suggestions. He then requested project proponent to give presentation regarding salient features of the said project & satisfy the queries/objections raised during the course of public hearing.

On behalf of Project Proponent, **Shri. S. Tamhane (Environmental Consultant)** submitted that the said redevelopment project has obtained necessary permission from MCGM & Govt. of Maharashtra as per CRZ notification 1991. Now we have applied for additional benefits of FSI and NOC from MCZMA as per CRZ notification 2011. Then, he made a Power Point Presentation indicating salient features of the said project, Environmental related aspects and salient features of EIA report in Marathi. The project proponent elaborated the details of proposed project on following grounds.

- Project Description.
- Environmental Base Line Data with respect to Air, Water, Land, Noise, Ecology, Settlements, etc.
- Impact likely to occur due to the proposed project on Air, Water, Noise, Hydrology, Settlements and Bio-diversity and forest.
- Mitigation measures and Environment management plan for the project during construction phase, operation & post operation phase

Thereafter, Convener of Public Hearing announced that the forum is open for question and answer session. The statement of issues raised during public hearing is as under.

## STATEMENT OF ISSUES

### 1. Chairman of Panel & District Collector, Mumbai (City)

| Sr. No. | Issue raised | Comment on the Question(s) by the project proponent. |
|---|---|---|
| 1. | Presently are there any live trees on the site? Is there any provision of tree plantation in the redevelopment construction project? | Sir, there are five live trees in the said plot and we will plant new trees as per availability of space. |
| 2 | In your presentation, you have shown that you will plant varity of trees in redevelopment project. But the plant like Neem tree, you have shown in the presentation will not survive in the climate of Mumbai. | Sir, we assure that we will plant the trees which will survive in the climate of Mumbai. |

2. SRO – Mumbai-I.

| Sr. No. | Issue raised | Comment on the Question(s) by the project proponent. |
| --- | --- | --- |
| 1 | Why don't you opt for electrolysis technique for waste water treatment instead of Grey water treatment plant to mitigate the pollution load? | Sir, operation maintenance cost of electrolysis based waste water treatment plants is very high compared to Grey water treatment plant. But we will definately think as per your suggestion. |
| 2 | What is present situation of redevelopment construction project? | Structural work of project has been completed upto 8[th] floor as per plan approved by MCGM & CRZ notification 1991. Now we have applied for additional benefits of FSI and NOC from MCZMA as per CRZ notification 2011. Remaining construction work will commence after obtaining necessary approvals' from MCZMA & other authorities. |

3. RO – Mumbai.

| Sr. No. | Issue raised | Comment on the Question(s) by the project proponent. |
| --- | --- | --- |
| 1 | Is there provision of utilization of natural energy resources such as Solar Energy? | Yes sir, we have proposed use of natural energy resources such as Solar Energy. |

4. Shri. Tushar, Tenant.

| Sr. No. | Issue raised | Comment on the Question(s) by the project proponent. |
| --- | --- | --- |
| 1 | I am satisfied about the Environmental provision proposed by project proponent | --- |

Thereafter, Convener of the public hearing called upon the people present whether there are any other queries /issues if any, the same may be asked. However, nobody came with any query thereafter.

The Chairman of the Committee while concluding the proceedings summarized various points raised. With this the Chairman concluded public hearing with the vote of thanks.

(A.S. Nandvate)
**I/c. SRO, MPCB**
**Mumbai-I**
and
Convener
Public Hearing Panel

(Dr. J. B. Sangewar)
**RO, MPCB**
**Mumbai**
and
Member,
Public Hearing Panel

(Chandrashekhar V. Oak)
**Collector, Mumbai**
and
Chairman
Public Hearing Panel